Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३४] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २६-सप्टेंबर १, २०२१/भाद्रपद ४-१०, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–६ |
| **भाग एक-अ.**–(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८६७.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) अन्वये**

क्रमांक कावि-अ.का.-भूसंप्रक्र-गोळेगांव खु.-१०९१-२०२१.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम (३) च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. एम.आय.एस.११/२०१४/सी.आर.७१/अे-२, दिनांक ११-०९-२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खाली कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क महाराष्ट्र नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १६-मौजे टाकळी खासा-२०२०-२०२१, मौजे टाकळी खासा, तालुका जळगांव जामोद, जिल्हा बुलडाणा

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | २६ | २ १९ |
| २ | २६ | १ ४१ |
| ३ | २६ | ० ८४ |
| ४ | २७ | ० ५८ |
| ५ | २८-अ | २ ३८ |
| ६ | २८-ब | १ २१ |
| ७ | २५ | २ ८९ |
| | एकूण . . | ११ ५० |

## अनुसूची—दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | जिगांव प्रकल्प, ता. नांदुरा, जि. बुलडाणा. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | मौजे गोळेगांव खु., ता. जळगांव जा. येथिल नवीन गावठाणाकरीता मौ. टाकळी खासा येथिल ११.५० हे. आर जमीन भूसंपादनाचे कामासाठी. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्याना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे. |

## अनुसूची—तीन

### बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदरचा प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून त्यास शेतक-यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधित होत असल्याने तसेच त्यामधील व्यक्ती विस्थापित होत असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे.

## अनुसूची—चार

### सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

अतिरिक्त संचालक, भारत सरकार व पर्यावरण मंत्रालय, पर्यावरण भवन, लोधी रोड, नवी दिल्ली - ११०००३, क्रमांक जे/१२०११/२२/२००७/आयएआय, दिनांक ११-२-२००७ अन्वये पर्यावरण सर्व्हेक्षण मंजुरी झालेली असल्याने भूसंपादन अधिनियम, २०१३ चे प्रकरण क्र. ०२, कलम ०६(२) चे परंतुकानुसार Provided that in respect of irrigation project where the process of Environment Impact Assessment is required under the provision of any other law for the time being in force, the provision of the Act relating to Social Impact Assessment shall not apply असे नमूद केले असल्याने सामाजिक परिणाम निर्धारण लागू नाही.

## अनुसूची—पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्याना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच, सदरचा प्रकल्प हा अनुषेशग्रस्त जिल्ह्यातील दुष्काळ प्रवण भागातील असून अतिशय कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधित होत असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे. सबब प्रशासक नियुक्ती करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | – उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा. |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील. | – शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. आर.पी.पी.ए.२०१५/र-अे, दिनांक १०-०६-२०१५ |

**टीप :—**उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद, जि. बुलडाणा यांचे कार्यालयमध्ये निरीक्षण करता येईल.

**एस. राममुर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक ८ जुलै २०२१.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८६८.

## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तथा सदस्य सचिव, यांजकडून

**वाचा :—**(१) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३-२०१५/प्र.क्र. ३४/अ-२, दि. १२-०५-२०१५.

(२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीण-०३-२०१५/प्र.क्र. ३४/अ-२, दि. ३०-०९-२०१५.

(३) म. शा. महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र. एलक्यूएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २५-०१-२०१७.

### खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत

क्रमांक मं.अ.-विभूसंअ.(अवप्र)क्र.२-कावि-०५-२०२१.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी अमरावती-बडनेरा रेल्वे क्रॉसींग उड्डाणपुलाच्या बांधकामाकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ०३-२०१५-प्र.क्र.३४-अ-२/ दिनांक १२-०५-२०१५ व दिनांक ३०-०९-२०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे नांवे घेण्याबाबत त्यांचे पत्र क्र. लि. जमीन-प्रस्ताव-३९७६-२०, दिनांक १४ जुलै, २०२० नुसार सरळ खरेदी प्रस्ताव २९-४७-२०१९-२० मौजा बडनेरा, ता. जि. अमरावती एकूण क्षेत्रफळ संयुक्त मोजणीनुसार ४६१९.९० चौ. मी. चा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश पत्र क्र. अ.का/प्र.अ./भूसंपादन/कावि-३५७/२० प्राप्त दिनांक २२ जुलै, २०२० अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व ३० ऑक्टोबर, २०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७ प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता,

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),(अवप्र) लाभक्षेत्र क्रमांक २, अमरावती तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, अमरावती याद्वारे :—

### अनुसूची-एक

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. आणि

### अनुसूची-दोन

अमरावती-बडनेरा रेल्वे क्रॉसींग उड्डाणपुलाच्या बांधकामाकरीता जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने संपादीत करतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुर्स्थापना करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

### अनुसूची-तीन

संबंधीत भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे नांवे खरेदी करून देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागविण्यात आलेली आहेत.

(२) संबंधीत भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमती पत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

(४) सदर रस्त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तीना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची-चार**

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक २९-४७-२०१९-२० मौजा बडनेरा, ता. जि. अमरावती.

अमरावती-बडनेरा रेल्वे क्रॉसींग उड्डाणपुलाच्या बांधकामाकरीता समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशील

| अनुक्रमांक | मौजा | सर्व्हे क्रमांक | भूधारणा प्रकार | अधिकार अभिलेखा प्रमाणे एकूण क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | (चौ. मी.) | (चौ. मी.) |
| १ | बडनेरा | ६/१/ब/८ | १ | ५५१.०० | ६.८७ |
| २ | बडनेरा | ६/१/ब/९ | १ | ५७०.०० | १४.७० |
| ३ | बडनेरा | ६/१/ब/१० | १ | ५७०.०० | २५.२१ |
| ४ | बडनेरा | ६/१/ब/११ | १ | ५१०.०० | २२.११ |
| ५ | बडनेरा | ६/१/ब/१२ | १ | ५१०.०० | १७.१४ |
| ६ | बडनेरा | ६/१/ब/१३ | १ | ५२९.५० | १.४६ |
| ७ | बडनेरा | ६/५/१ | १ | ७४८.१२ | ४६.६६ |
| ८ | बडनेरा | ६/१/अ/१ | १ | १०४२.८० | १८८.५० |
| ९ | बडनेरा | ६/२/१ | १ | ६५०.५५ | २३६.३३ |
| १० | बडनेरा | ६/२/२पै. | १ | २३२.३४ | ९६.७० |
| ११ | बडनेरा | ६/२/२पै. | १ | २३२.३४ | ९५.६२ |
| १२ | बडनेरा | ६/२/३पै. | १ | २३२.३४ | ९५.९६ |
| १३ | बडनेरा | ६/२/३पै. | १ | २३२.३४ | ९५.८२ |
| १४ | बडनेरा | ६/२/४ | १ | ४६४.६८ | १८८.२० |
| १५ | बडनेरा | ६/२/५ | १ | ४६४.६८ | १९९.०७ |
| १६ | बडनेरा | ६/२/६पै. | १ | २५५.७६ | १०६.३३ |
| १७ | बडनेरा | ६/२/६पै. | १ | २५५.५७ | ७४.१५ |
| १८ | बडनेरा | २०/१/च पै. | १ | ७४०० | ४८५.५७ |
| १९ | बडनेरा | २०/१/च पै. | १ | ४१०० | २६८.८६ |
| २० | बडनेरा | २०/१/ब | १ | २२०० | ३१०.८३ |
| २१ | बडनेरा | २०/१/क | १ | ८००० | ३४३.३२ |
| २२ | बडनेरा | २०/१/घ | १ | ३०० | १७५.४७ |
| २३ | बडनेरा | २०/१/ग | १ | ११३०० | ५०१.९३ |
| २४ | बडनेरा | २०/१/ह पै. | १ | ८०० | ३९.७७ |
| २५ | बडनेरा | २०/१/ह पै. | १ | ३०० | १३७.४० |
| २६ | बडनेरा | २१/२/क पै. | १ | ३७०० | ८२७.४६ |
| २७ | बडनेरा | २१/२/क पै. | १ | १८५० | १८.४६ |
| | | | एकूण . . | ४८००२.०२ | ४६१९.९० |

**मनोज लोणारकर,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
(अ.व.प्र) लाभक्षेत्र क्र. २, अमरावती
तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय समिती, अमरावती.

अमरावती :
दिनांक १२ ऑगस्ट २०२१.

अ.-एक-२ (१५९२).

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८६९.

## उपनिबंधक सहकारी संस्था, यांजकडून

### आदेश

क्रमांक ताउनि-अको-विनियम-नोंदणी रद्द आदेश-कलम २१-१३८९-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ व शासन निर्णय क्र. सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९३ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी, राजेंद्र पालेकर, उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अकोला याद्वारे तालुका देखरेख सहकारी संघ मर्या., अकोला नोंदणी क्र. ३०१ संस्थेची नोंदणी या आदेशाचे दिनांकापासून रद्द झाली असल्याचे व या संस्थेचे "एकव्यक्तिभूत संस्था" म्हणून असलेले अस्तित्व संपुष्टात आले असल्याचे घोषित करीत आहे.

सदरचे आदेश आज दिनांक ३० जुलै २०२१ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह देण्यात येत आहेत.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७०.

### आदेश

क्रमांक ताउनि-अको-विनियम-नोंदणी रद्द आदेश-कलम २१-१३९०-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१, (१०९) १ अन्वये व शासन निर्णय क्र. सीएसएल-१४९३-११६२-सीआर-४७-१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९३ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी, राजेंद्र पालेकर, उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अकोला याद्वारे कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकोला, ता. जि. अकोला नोंदणी क्र. ३४९ संस्थेची नोंदणी या आदेशाचे दिनांकापासून रद्द झाली असल्याचे व या संस्थेचे "एकव्यक्तिभूत संस्था" म्हणून असलेले अस्तित्व संपुष्टात आले असल्याचे घोषित करीत आहे.

सदरचे आदेश आज दिनांक ३० जुलै २०२१ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह देण्यात येत आहेत.

**राजेंद्र पालेकर,**

अकोला : उपनिबंधक,

दिनांक ३० जुलै २०२१. सहकारी संस्था, तालुका अकोला.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७१.

क्रमांक सनिद-नियमन-रमाई महिला पतसंस्था- अधिसूचना-३०३-२०२१.—

मी, भालचंद्र पारिसे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, दर्यापूर, जि. अमरावती ह्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित करतो की, रमाई महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., चांदुर जहानपूर, र.नं. ४६६ ता. दर्यापूर, जि. अमरावती ह्या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) करण्यात आली असून संस्थेचा नोंदणी क्र. अेटीआय (डीपाआर)आरएसआर-सीआर-४६६-२०२१, दिनांक २ ऑगस्ट २०२१, हा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण साधन संपत्ती संस्था करण्यात आली असून उपवर्गीकरण "कर्ज देणा-या साधन संपत्ती संस्था" करण्यात आले आहे.

**भालचंद्र पारिसे,**

दर्यापूर : सहाय्यक निबंधक

दिनांक २ ऑगस्ट २०२१. सहकारी संस्था, दर्यापूर.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७२.

क्रमांक वि.१-प्रशासन-नोंदणी-नि.दिव्यज्योती महिला अर्बन-७७१-२०२१.—

नोंदणी क्र. बियुडी-(बीयुडी)-सीएसआर-३९६-२०२१, दिनांक २७ जुलै २०२१ अन्वये सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका बुलडाणा यांनी प्रसिद्ध केले आहे. दिव्यज्योती महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि., बुलडाणा ही पत संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) चे कलम ९ (१) अन्वये क्र. ७६६-२०२१, दिनांक २७ जुलै २०२१ नुसार नोंदणी केली आहे. त्यानुसार सदर संस्थेचे मुख्य वर्गीकरण "साधन संस्था" असून उपवर्गीकरण "कर्ज देणा-या साधन संस्था" असे आहे.

(अवाच्य),

बुलडाणा : सहाय्यक निबंधक,

दिनांक २७ जुलै २०२१. सहकारी संस्था, तालुका बुलडाणा.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७३.

क्रमांक स.नि.दे.-संस्था नोंदणी-अधिसूचना-८६७-२०२१.—

सहायक निबंधक, सहकारी संस्था, देऊळगाव राजा ता. देऊळगाव राजा, जि. बुलडाणा याद्वारे सूचित करतो की, राजयोगी कृषी शेतकरी सेवा पुरवठा सहकारी संस्था मर्या., देऊळगाव राजा, ता. देऊळगाव राजा, जि. बुलडाणा ह्या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदणी करण्यात आली असून संस्थेचा नोंदणी क्र. बियुडी-डीजीएन-सर्वसाधारण संस्था-७२९-२०२१, आहे व नोंदणी दिनांक ३० जुलै २०२१, आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ (१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ चे नियम १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण "सर्वसाधारण संस्था" करण्यात आले असून उपवर्गीकरण "इतर संस्था" करण्यात आले आहे.

**एस. यु. जगदाळे,**

देऊळगाव राजा : सहाय्यक उपनिबंधक,

दिनांक ३० जुलै २०२१. सहकारी संस्था, देऊळगाव राजा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.